# प्रकरण – 14

## हॉस्पीटलकडून देण्यात येणा-या मोफत सुविधा

सदरहू फंडाद्वारे गरीब गरजू रुग्णांना आर्थिक मदत पुरविली जाते त्यासाठी काही मर्यादा ठरविण्यात आलेली नाही, परंतु गरजेनुसार मदत अवलंबून असते.

गरीब धर्मादाय निधीकडून आर्थिक मदत मिळविण्यासाठी व्यक्ती दारिद्रय रेषेखाली येणारी असावी लागते. तसेच रुग्णांच्या ओपीडी फॉर्मवर संपूर्ण माहिती असावी लागते.

सदरहू सुविधांचा फायदा घेण्यासाठी एका को-या कागदावर अर्ज लिहून तो समाज विकास अधिकारी यांचेकडे देण्यात येतो. त्यासाठी अर्जाचे शुल्क भरावे लागत नाही. सदरहू अर्जासोबत एक केसपेपरची झेरॉक्स प्रत लावावी. समाज विकास अधिकारी सदर रुग्णांची व त्यांचे नातेवाईकांची विचारपूस करुन सदरचा अर्ज आपल्या अभिप्रायासह अंतिम मंजूरीसाठी प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येतो. यासाठी साधारणपणे एक दिवसाचा अवधि लागतो.

आवश्यक असणारी औषधे हॉस्पीटलकडून खरेदी करुन रुग्णाला दिली जातात. कोणत्याही प्रायव्हेट चाचणीची गरज असल्यास हॉस्पीटल फी भरणा करण्यासाठी मदत करते.

मृत व्यक्तीच्या लोकांना/नातेवाईकांना मृत व्यक्तीचे पार्थिव घेण्यासाठी व त्यांच्या नियोजित स्थळी 24 तासांचे आत नेण्यासाठी हॉस्पीटल परवानगी पत्र देते.